महाराष्ट्र शासन

शासकीय परिवहन सेवा

सर पोचखानवाला मार्ग,वरळी,मुंबई,

दूरध्वनी :- ०२२-२४९३ १८५६ /०२२-२४९३ २९७२ / ०२२-२४९३ ९५५३ / ई.मेल -gts.worli@gmail.com

जा.क्र. संगणक ख.वा.दे.दु./२०२५/र.व.का./प्र.क्र.६ /कार्या रवका / ८०१

दिनांक :- १८/०६/२५

शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयात ऑल ईन वन १० नग व डेस्क टॉप ९ नग असे एकूण १९ नग संगणक नेटवर्किंगमध्ये व झेरॉक्स मशीन कार्यरत आहेत. संगणक व नेटवर्किंगमध्ये कार्यरत असलेले २७ नेटवर्किंग पॉइंट, ३ राउटर, २४ पोर्टचा १ स्वीच व ३२ आय.ओ.बॉक्स, पँच कॉर्ड/आर.जे ४५ व संलग्न नेटवर्क केबल सुस्थितीत ठेवण्याकरिता शासन निर्णय वित्त विभाग, क्र.विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३ विनियम, भाग-२ दि १७/०४/२०१५ भाग पहिला उप विभाग दोन मधील अ.क्र.२८,नियम क्र.७६ नुसार स्वत:च्या कार्यालयात किंवा दुय्यम कार्यालयात उपयोगात असलेल्या सर्व यंत्रांच्या संदर्भात ती सुस्थितीत ठेवण्यासंबंधीची / सेवा संविदा दरकरार करण्यासाठी पुर्ण अधिकार आहे. प्राप्त अधिकाराचा वापर करून दिनांक १५/०७/२०२५ ते १४/०७/२०२६ या वार्षिक कालावधीकरीता इच्छुक संस्थेकडून खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून वार्षिक दुरुस्ती व देखभालीकरिता सेवा संविदा दरकरार करण्याकरिता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

संगणक व नेटवर्किंग याची वार्षिक दुरुस्ती व देखभालीकरिता सेवा संविदा दरकरार जाहिरात शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांच्या सूचना फलकावर तसेच महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर प्रसिद्द करण्यात येईल.

| अनु.क्र. | दरपत्रके प्रक्रिया | तपशील |
|---|---|---|
| १ | दरपत्रके उपलब्ध होण्याची तारीख व वेळ | दि. १८/०६/२०२५ सकाळी ११.०० वाजता |
| २ | शा.प.सेवा कार्यालयात दरपत्रके जमा करण्याची अंतिम तारीख व वेळ | दि. २६/०६/२०२५ दुपारी ०३.०० वाजता |
| ३ | शा.प.सेवेत मा.नियंत्रण कक्षात दरपत्रके उघडण्याची तारीख व वेळ | दि. २६/०६/२०२५ दुपारी ०४.०० वाजता |
| ४ | शा.प.सेवा,वरळी येथे संगणक व सलंग्न साहित्य पाहण्याकरिता उपलब्ध | दि. १८/०६/२०२५ ते दि. २६/०६/२०२५ |
| ५ | वार्षिक दुरुस्ती व देखभाल सेवा संविदा दरकरार कालावधी | दि. १५/०७/२०२५ ते दि. १४/०७/२०२६ |

**विवरणपत्र नमुना ( संस्थेने लेटरहेड वर भरून द्यावे )**

| अनु.क्र . | तपशील | मुळ रक्कम रु. | वस्तू व सेवाकर रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १ | ऑल ईन वन १० नग व डेस्क टॉप ९ नग एकूण १९ संगणक ( नॉन- कॉम्प्रेहेन्सिव्ह ) | | | |
| २ | २७ नेटवर्किंग पॉइंट, ३ राउटर, २४ पोर्टचा १ स्वीच व ३२ आय.ओ.बॉक्स, पँच कॉर्ड / आर.जे ४५ व संलग्न नेटवर्क केबल ( नॉन- कॉम्प्रेहेन्सिव्ह ) | | | |
| ३ | **एकूण वार्षिक दुरुस्ती व देखभाल रक्कम (वस्तू व सेवाकरांसहित )** | | | |

Scanned with OKEN Scanner

अटी व शर्ती :-

- दरपत्रक शुल्क रु.५००/- ( ना-परतावा ) रोखीने रोखपाल शाखेकडे जमा करून रीतसर पावती जोडावी.
- संगणक व संलग्न नेटवर्किंग साहित्य "वार्षिक दुरुस्ती व देखभाल सेवा संविदा दरकरार" च्या न्यूनतम प्राप्त दरपत्रकाच्या ( वस्तू व सेवाकरासहित ) एकूण रकमेच्या ३% इतकी अनामत रक्कम बँक गॅरंटी स्वरुपात यशस्वी निविदा धारकाने रोखपाल शाखेकडे जमा करावी तसेच अनामत रकमेवर कोणतेही व्याज देय नाही.
- पुरवठादार संस्था ही मुंबई महानगर क्षेत्र ( Mumbai Metropolitan Region ) मधीलच असावी. जेणेकरून सत्वर सेवा उपलब्ध होऊ शकेल.
- शा.प.सेवा कार्यालयात कार्यालयीन वेळेतच संगणक व संलग्न नेटवर्किंग साहित्य पाहता येईल.
- **विवरण पत्रामधील नमूद अनु क्र.१ व २ करिता एकूण वार्षिक रक्कम रकान्यात भरावी तसेच अधिक वस्तू व सेवा कर रक्कम भरावी.**
- **विवरण पत्रामधील अनु क्र.३ मधील वस्तू व सेवाकरासहित नमूद एकूण न्यूनतम रकमेला अंतिम मान्यता देण्यात येईल. तसेच या संस्थेला यशस्वी निविदाधारक म्हणून घोषित करण्यात येईल.**
- संगणक व संलग्न नेटवर्किंग साहित्य पाहूनच मूळ रक्कम अधिक वस्तू व सेवा कर नमूद करूनच न्यूनतम मोहोरबंद दरपत्रके विहित कार्यालयीन वेळेतच कार्यालयात जमा करावी. उशिरा प्राप्त झालेले दरपत्रके स्वीकारण्यात येणार नाहीत.
- **संगणक व सलंग्न साहित्यांचा नादुरुस्त होणारा सुटा भाग बदलने किंवा त्या अनुषंगिक मोठ्या व खर्चिक असलेल्या कामाची कार्यालयीन परवानगी घेणे आवश्यक राहील. तसेच सदर सुटा भाग बाजारभावापेक्षा न्यूनतम दरानेच पुरविण्यात यावा.**
- दूरध्वनीद्वारे तक्रार नोंदविल्यास २४ तासात तात्काळ आपले संगणक व नेटवर्किंग तज्ञ हजर होऊन तक्रार निवारण करून संगणक व संलग्न यंत्रणा कार्यान्वित करून देणे बंधनकारक राहील.
- **आपल्या सेवेत त्रुटी / दिरंगाई आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता सदर वार्षिक सेवा संविदा दरकरार तात्काळ प्रभावाने रद्द करण्यात येवून ३% अनामत बँक गॅरंटी रक्कम यशस्वी निविदाधारकास अदा करण्यात येणार नाही.**
- पुरवठादार संस्थेने दिलेल्या बँक तपशील / अदाता प्रमाणपत्रा नुसार संगणक प्रणालीद्वारेच त्रैमासिक पद्धतीने देयकाची रक्कम पुरवठादार संस्थेच्या खात्यात ऑनलाईन प्रणालीद्वारेच जमा करण्यात येईल.
- संस्थेचे वस्तू व सेवाकर प्रमाणपत्र, पॅन क्रमांक , उद्योग आधार प्रमाणपत्र तसेच कामाचा अनुभव प्रतिलिपी सोबत जोडाव्यात.
- **वार्षिक दुरुस्ती व देखभाल सेवा संविदा दरकरारनामा रु ५०० /- च्या गैर न्यायिक पेपरवर लिहून द्यावा तसेच त्यामधील अटी व शर्तीचे तंतोतंत पालन करावे.**
- **वार्षिक दुरुस्ती व देखभाल सेवा संविदा दरकरारा संदर्भात काही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास त्याचे कार्यक्षेत्र मुंबई राहील.**
- **संगणक व सलंग्न साहित्यांची वार्षिक दुरुस्ती व देखभालीकरिता सेवा संविदा दरपत्रकाद्वारे निविदेमध्ये कोणताही बदल अथवा सदर निविदा कोणत्याही टप्प्यावर स्थगित अथवा रद्द करण्याचे अधिकार मा. नियंत्रक, शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.**

( अजय साखरे )
नियंत्रक,
शासकीय परिवहन सेवा, मुंबई

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन
शासकीय परिवहन सेवा
सर पोचखानवाला मार्ग,वरळी,मुंबई,
दूरध्वनी :- ०२२-२४९३ १८५६ /०२२-२४९३ २९७२ / ०२२-२४९३ ९५५३ / ई.मेल -gts.worli@gmail.com

जा.क्र. संगणक ख.वा.दे.दु./२०२५/र.व.का./प्र.क्र.६ /कार्या-रवका / ८०२ दिनांक :- १८/०६/२५

मा.संचालक ,
माहिती व तंत्रज्ञान ,
मादाम कामा मार्ग ,हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय ,मुंबई -४०० ०३०

**विषय- कार्यालयीन संगणक व संलग्न नेटवर्किंग यंत्रणेचा वार्षिक दुरुस्ती व देखभाली संदर्भात सेवा संविदा दरकरार जाहिरात शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत.**

**महोदय,**

सामान्य प्रशासन विभाग , ( राजशिष्टाचार ), मंत्रालय. मुंबई यांच्या अधिनिस्त शासकीय परिवहन सेवा ,वरळी , मुंबई कार्यालय हा अतिमहत्वाचा विभाग असून या कार्यालयामार्फत भारताचे व विविध देशांचे मा.राष्ट्रपती,मा.उपराष्ट्रपती , तसेच भारताचे सर्वोच्च न्यायालयाचे मा.सर न्यायाधीश इतर राज्यांचे मा.मुख्य न्यायाधीश , इतर राज्यांचे मा.राज्यपाल, मा.मुख्यमंत्री ,मा.उप मुख्यमंत्री, मा. केंद्रीय मंत्री यांच्या मुंबई भेटीदरम्यान परिवहन व्यवस्था हाताळण्यात येते.

शासकीय परिवहन सेवा, वरळी, मुंबई या कार्यालयात ऑल ईन वन १० नग व डेस्क टॉप ९ नग असे एकूण १९ नग संगणक नेटवर्किंगमध्ये व झेरॉक्स मशीन कार्यरत आहेत. संगणक व नेटवर्किंगमध्ये कार्यरत असलेले २७ नेटवर्किंग पॉइंट, ३ राउटर, २४ पोर्टचा १ स्वीच व ३२ आय.ओ.बॉक्स, पँच कॉर्ड/आर.जे ४५ व संलग्न नेटवर्क केबल सुस्थितीत ठेवण्याकरिता वार्षिक दुरुस्ती व देखभालीकरिता सेवा संविदा दरकरार करणे प्रस्तावित आहे. याकरिता इच्छुक मुंबई महानगर क्षेत्र ( Mumbai Metropolitan Region ) मधील पुरवठादार संस्थेकडून अटी व शर्तीच्या अधीन राहून दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर जाहिरात दि. १८/०६/२०२५ ते २६/०६/२०२५ या कालावधीत पाहता येईल. पत्रासोबत जोडण्यात आलेली जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या https://www.maharashtra.gov.in अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

आपला,

( अजय साखरे )
नियंत्रक,
शासकीय परिवहन सेवा,मुंबई

Scanned with OKEN Scanner